स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखे अंतर्गत मराठी विषयातील पीएच.डी (विद्यावाचस्पती)
पदवीसाठी सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधन विषय

परभणी जिल्ह्यातील बंजारा समाजातील स्त्रियांची लोकगीते : एक चिकित्सक अभ्यास

संशोधक

प्रा. आडे संजय लक्ष्मण
रा. गडदगव्हाण ता. जिंतूर जि. परभणी
पिन - ४३१ ५०९

मार्गदर्शक

डॉ. पंढरीनाथ नारायणराव धोंडगे
प्रोफेसर, संशोधक मार्गदर्शक मराठी विभाग,
ज्ञानोपासक महाविद्यालय, जिंतूर जि. परभणी
पिन - **४३१ ५०९**

संशोधन केंद्र

भाषा, वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकूल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६.

ऑगस्ट २०२३

-: अनुक्रमणिका :-

01)	प्रास्ताविक	03
02)	संशोधन विषयाची निवड	04
03)	संशोधनाची व्याप्ती	05
04)	संशोधनाच्या मर्यादा	05
05)	संशोधनाची गृहितके	05
06)	संशोधनाचे महत्त्व	05
07)	अभ्यास साधनसामग्रीची उपलब्धता	06
08)	संशोधन पध्दती	06
09)	संशोधन विषयाचा उद्देश	06
10)	संशोधनातील संभाव्य निष्कर्ष	06
11)	शोधप्रबंधाचा आराखडा	07
12)	संदर्भग्रंथ सूची	12

प्रास्ताविक :-

भारतीय बंजारा साहित्य हे भारतीय वाङमयीन चळवळीतील एक समृध्द साहित्य आहे. बंजारा साहित्य हे देवनागरी (मराठी) लिपीतून आज मोठ्या प्रमाणात बंजारा लोकसाहित्य मौखिक सहित्याच्या स्वरूपाने जतन केल्याचे दिसून येते. ज्याप्रमाणे मराठी साहित्य, दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य म्हणून पाहिले जाते. त्याचप्रमाणे बंजारा साहित्य म्हणून पाहिले जाते. बंजारा लोकसाहित्याला स्वत:ची प्राचीन स्वतंत्र बंजारा भाषा तसेच वैभवशाली संस्कृतीचा फार मोठा वारसा लाभलेला आहे. बंजारा साहित्याचे अस्तित्व बंजारा समाजाच्या जीवनमूल्यात आणि तत्त्वज्ञानात आहे. अखिल भारतीय स्तरावर बंजारा साहित्य संमेलन होताना दिसून येते. थोर समाजसुधारक तथा आद्य इतिहासकार बळीरामजी पाटील ते आजच्या नव्या पिढीतील सर्जनशील, विचारवंत एकनाथराव पवार हा बंजारा साहित्य, संस्कृतीला समृध्द करणारा मौलिक कालखंड मानला जातो.

प्राचीन साहित्य आणि मध्ययुगीन साहित्याच्या कालखंडात लोकसाहित्याची भूमिका अग्रगण्य राहिली आहे. बंजारा साहित्य संस्कृतीचा इतिहास मौखिक लोकसाहित्याच्या रूपाने आजही जिवंत आहे. ज्यात लडी, केणावट, लेंगी भजन, आरदास, ढावलो, हवेली, कलापथक, साळी इ. साहित्य प्रकार दिसून येतात. या माध्यमातून बंजारा भाषा, लोकगीत, स्त्रीगीत यांचे संवर्धन व जतन होत आहे. प्रा. मोतीराम राठोड, ग.ह. राठोड, धनंजय नाईक, रमेश जाधव, अशोक पवार, पंजाब चव्हाण, वीरा राठोड, एकनाथ पवार, सुनील राठोड आदी प्रतिभावंत साहित्यिकांनी बंजारा साहित्याचा वारसा अबाधित ठेवला आहे. बंजारा समाजातील लोकगीत हा स्त्रियांचा आवडता प्रकार आहे. विविध सण व उत्सवामध्ये मोठया प्रमाणात सहभागी होवून त्या लोकगीतांचा आनंद घेतात.

आजही बंजारा समाजाची संस्कृती टिकून आहे. ही संस्कृती टिकवण्यामध्ये स्त्रियांचे योगदान मोठ्या प्रमाणात आहे. बंजारा समाजाचा खरा इतिहास आणि त्यांचे सामाजिक जीवन फक्त मौखिक बोलीभाषा आणि त्यांच्या सांस्कृतिक परंपरामधून जिवंत आहे. आपल्याला बंजारा समाजातील कथा, भजन, लोकगीते यातून बंजारा समाजाची खरी ओळख संस्कृती तसेच इतिहास पहायला मिळतो. बंजारा समाजातील मौखिक गीत, कथा, भजन, गाणी यातून बंजारा चालीरिती व पंरपरेचे दर्शन घडते.

आजच्या घडीला बंजारा समाज सुसंस्कृत आणि संपन्न पहायला मिळतो. त्यांची आगळी-वेगळी वेशभूषा, केशभूषा, पोषाख वेगवेगळी अभूषणे, बोलीभाषा, प्रथा व परंपरा यामुळे या समाजाची जागतिक स्तरावर एक वेगळीच ओळख निर्माण झाली आहे. जगभरात पसरलेल्या बंजारा समाजाला वेगवेगळया नावाने ओळखले जात असले तरी त्यांच्या चालीरिती रूढी-परंपरा भाषा वेशभूषा, केशभूषा, लोकगीत व संस्कृती सणसंमारभ कमी-अधिक प्रमाणात सारखेच आहे. बंजारा समाजातील लोकगीत हे बंजारा समाजाचा यांचा आत्मा आहे. बंजारा स्त्रीही लोकगीताशिवाय राहू शकत नाही. लोकगीत

त्यांच्या नसानसात भिनलेले आहे. कोणताही सण-उत्सव असो त्या लोकगीत गायल्याशिवाय त्यांचे सण व उत्सव साजरे होत नाहीत. यामध्ये दिवाळीगीत, होळीगीत, लग्नगीत, विरहगीत, तिजगीत असे विविध गीत गाऊन सण साजरे करतात.

संशोधन विषयाची निवड :-

बंजारा संस्कृतीमध्ये लोकगीतांला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. बंजारा समाज हा कधीच लोकगीतापासून अलिप्त राहू शकत नाही. हा लोकगीतांचा वारसा प्रत्येक बंजारा समाजातील स्त्री-पुरूषाने पिढ्यानपिढ्या सांभाळत आलेले आहेत. बंजारा लोकगीत हे स्त्री-पुरूषाचा आत्मा आहे. या समाजातील लोकगीत स्त्रीयांच्या नसानसात भिनलेले पहायला मिळतात. या संस्कृतीतील लोकगीताचा अनमोल ठेवा आपल्या मनामध्ये जतन करून ठेवलेला आहे. हे लोकगीत मौखिक स्वरूपात असल्यामुळे यांना समाजातील पुढील पिढ्यासाठी लिपीबध्द करणे मला गरजेचे वाटले.

माझा जन्म बंजारा कुटूंबामध्ये झालेला असून मला माझ्या समाजातील लोकगीताविषयी आवड व जिव्हाळा आहे. हा लोकगीताचा मौखिक स्वरूपातील अनमोल ठेवा या शोधप्रबंधाच्या माध्यमातून लिपीबध्द करून या लोकगीताचे जतन व संवर्धन करता येईल, म्हणून मुद्दामहुन मी हा विषय निवडला आहे. बंजारा वाङमयीन परंपरा खूप जुन्या काळापासून चालत आलेली आहे. त्या पंरपरेतील एक महत्त्वाचा घटक म्हणजे बंजारा लोकगीत. लोकगीताची परंपरा ही आजपर्यंत टिकून आहे. जसे जीवन जगण्यासाठी अन्न, वस्त्र, निवारा आवश्यक आहे. त्याचप्रमाणे बंजारा लोकगीत बंजारा याकरिता आवश्यक आहे. लोकगीत हा यांचा आत्मा आहे. या समाजाच्या स्त्रिया लोकगीतापासून वंचित राहू शकत नाहीत. आज जरी काही प्रमाणात बंजारा लोकगीत लिखीत स्वरूपात पहायला मिळत असले तरी खूप मोठे लोकगीत आजही मौखिक स्वरूपात, ऐकायला मिळतात. या मौखिक गीतांना लिखित स्वरूपात आणणे खूप गरजेचे आहे.

बंजारा समाजातील स्त्रियांचे गीत मौखिक स्वरूपात त्यांच्या ओठावरच विखूरलेल्या अवस्थेत ऐकायला मिळतात. त्याची जुळवाजुळव करून मांडणे खूप महत्त्वाचे आहे. जे मौखिक गीत आहेत ते गीत काही काळानंतर नष्ट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या गीताची परंपरा पुढे चालू शकेल व नवीन पिढीकरिता ते संवर्धन करून ठेवणे आवश्यक आहे. हे विखूरलेले गीत मौखिकतेतून लिखित करणे आवश्यक आहे. मौखिक पंरपरेतून चालत आलेल्या गीताची परंपरा लिखित स्वरूपात आणून देणे व यांचा फायदा येणाऱ्या पिढीतील लोकांना, स्त्रियांना होईल. सर्व बंजारा लोकगीते जर लिखित स्वरूपात उपलब्ध झाली तर ते कधीही नष्ट होणार नाही ही बाब मला सकारात्मक वाटली म्हणून संशोधनासाठी मी परभणी जिल्ह्यातील बंजारा समाजातील स्त्रियांचे लोकगीते एक चिकीत्सक अभ्यास हा विषय निवडला आहे.

संशोधनाची व्याप्ती :-

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती परभणी जिल्ह्यातील बंजारा समाजातील स्त्रियाच्या लोकगीताचा याचा चिकित्सक अभ्यास करून लोकगीताची प्राचीन परंपरा व या लोकगीतांच्या परपंरेचा समाजातील जनमाणसावर पडलेला प्रभाव, लोकगीतांमधून प्रकट होणारे स्त्रियांचे भाव, त्यांतील वास्तव तसेच प्रभाव यांची प्रस्तुत प्रबंधात सांगोपांग चर्चा केली जाणार आहे.

संशोधनाच्या मर्यादा :-

संशोधन कार्य परिपूर्ण व्हावे याकरिता काही मर्यादा संशोधनासाठी स्विकारल्या आहेत. बंजारा समाज हा फक्त महाराष्ट्रात नसून संपूर्ण भारतात विखूरलेला पहायला मिळतो. भारतातील संपूर्ण बंजारा समाजातील लोकगीतांचा अभ्यास करणे हे केवळ अशक्य आहे. करिता प्रस्तुत प्रबंधासाठी केवळ परभणी जिल्हयातील बंजारा स्त्री लोकगीतांचा अभ्यास अपेक्षीत आहे. शिवाय बंजारा समाजात स्वंतत्र लिपी नसल्यामुळे व जास्त साहित्य लिखित स्वरूपात नसल्यामुळे लोकगीतांचा अभ्यास करताना मर्यादा पडतात. गोरमाटी भाषा ही बंजारा समाजाची बोलीभाषा असल्यामुळे संवाद साधताना अडचण येते. म्हणजे बोलीभाषा ही एक मर्यादा आहे.

संशोधनाची गृहितके :-

1. बंजारा समाजातील स्त्री लोकगीतांचा वारसा खूप प्राचीन काळापासूनचा आहे.
2. बंजारा स्त्री लोकगीते खूप मोठ्या प्रमाणात विखुरलेल्या अवस्थेमध्ये असून त्यांना एकत्र करण्याची गरज आहे.
3. बंजारा स्त्री लोकगीतांतून बंजारा समाजाच्या लोकसंस्कृतीचे विविध दर्शन घडते.
4. विविधतेतून एकता ही बंजारा लोकगीतातून पहायला मिळते.
5. बंजारा समाजातील स्त्री लोकगीत खूप मोठ्या प्रमाणात मौखिक स्वरूपात पहायला मिळते.

संशोधनाचे महत्त्व :-

बंजारा लोकगीतांचा अभ्यास करताना असे जाणवते की, हा समाजा खूप प्राचीन काळापासून म्हणजे सिंधू संस्कृतीच्या कालखंडापासून अस्तित्वात आहे. भारतात विविध ठिकाणी वेगवेगळया नावाने जरी ही जमात राहत असली तरी या समाजाची भाषा रूढी, परंपरा, सण, उत्सव, वेशभूषा थोडया फार फरकाने सारखेच पहायला मिळतात.

बंजारा समाजातील स्त्री लोकगीतांतून त्यांची वैविध्यपूर्ण आणि उत्सवप्रिय संस्कृती उजागर होते. बंजारा स्त्री लोकगीतांच्या अभ्यासामुळे बंजारा समाजातील सामाजिक, धार्मिक, कौटुंबिक व सांस्कृतिक जीवन अभ्यासता येईल.

बंजारा स्त्री लोकगीतांचा अभ्यास करताना त्यांच्या गोरमाटी बोलीचा, परंपरा व संस्कारांचा तसेच सांस्कृतिक वैशिष्ठयांचा आलेख मांडण्याचा प्रयत्न सदरील प्रबंधात केला जाणार आहे.

संशोधन अभ्यास साधनसामग्रीची उपलब्धता :-

प्रस्तुत संशोधन लोकगीताशी निगडीत असल्यामुळे मौखिक गीताची उपलब्धता तसेच संदर्भग्रंथ पुस्तके, मासिके, वाङमय कोश, दिवाळी विशेषांक इत्यादी विविध ठिकाणचे ग्रंथालय, प्रकाशन, संस्था या ठिकाणाहून उपलब्ध करून अभ्यासपूर्वक साहित्याचा अभ्यास करण्याचा यशस्वीपणे प्रयत्न केला जाईल.

संशोधन पध्दती :-

प्रस्तुत संशोधनासाठी उपलब्ध मराठी, हिंदी, बंजारा बोली लिखित साहित्याचा तसेच मौखिक लोकगीतांचा अभ्यास विश्लेषणात्मक, वर्णनात्मक तसेच मुलाखत, गटचर्चा पध्दतीने केला जाईल. तसेच इंटरनेट वरील साहित्य पध्दतीचा अवलंब करण्यात येईल.

संशोधन विषयाचा उद्देश :-

प्रस्तुत संशोधनाचे खालील उद्देश डोळ्यासमार ठेवून संशोधनाचे काम करण्याचे मी ठरवलेले आहे.

1) बंजारा समाजातील स्त्रियाच्या लोकगीतांचा अभ्यास करणे.
2) लोकगीतांच्या मौखिक परंपराचा अभ्यास करणे.
3) बंजारा लोकगीतातील भाषेच्या सौंदर्याचा अभ्यास करणे.
4) नैतिकमूल्ये व विवेकवादी दृष्टीकोणाचा विचार करणे.
5) बंजारा सामाजातील स्त्रियांच्या लोकगीतांचे वेगळेपण विशद करणे.
6) मौखिक परंपरेतील लोकगीतांना संकलीत करणे.
7) बंजारा समाजातील लोकगीतांची सांस्कृतिक पार्श्वभूमी अभ्यासणे.
8) ग्रामीण भागात राहणाऱ्या बंजारा समाजातील स्त्रियांच्या लोकगीतांच्या संस्कृतीचा आढावा घेणे.
9) जुन्या आणि नव्या लोकगीतांतील बदल अभ्यासणे.
10) बंजारा लोकगीतांमधून व्यक्त होणारे भाव अभ्यासणे.

संशोधनातील संभाव्य निष्कर्ष :-

समाजातील प्रत्येक जाती जमातीची लोकसंस्कृती असते व या लोकसंस्कृतीतूनच मानवाची ओळख होते. तसेच या लोकसंस्कृतीतूनच लोकजीवनाचे खरे प्रतिबिंब पडलेले पहायला मिळते.

लोकसंस्कृतीतून प्राचीन परंपरेसोबतच लोकगीत व त्यातील विशेषांचा अभ्यास करता येतो. लोकगीत हे जास्त प्रमाणत मौखिक स्वरूपात स्त्रियांच्या मुखात दडलेले असल्यामुळे याचा अभ्यास चिकित्सक पध्दतीने या शोधप्रबंधामध्ये केला जाईल.

-: शोधप्रबंधाचा आराखडा :-

प्रकरण पहिले	-	परभणी जिल्ह्यातील बंजारा समाजाचा इतिहास
प्रकरण दुसरे	-	बंजारा समाजाची संस्कृती
प्रकरण तिसरे	-	बंजारा समाजातील स्त्रियांच्या लोकगीतांचे स्वरूप
प्रकरण चौथे	-	बंजारा समाजातील स्त्रियांच्या लोकगीतांचे वर्गीकरण
प्रकरण पाचवे	-	बंजारा समाजातील स्त्रियांच्या लोकगीतांची वैशिठ्ये
प्रकरण सहावे	-	बंजारा समाजातील स्त्रियांच्या लोकगीतांचे वाङमयीन मूल्यमापन
प्रकरण सातवे	-	समारोप

प्रकरण पहिले - परभणी जिल्ह्यातील बंजारा समाजाचा इतिहास

या प्रकरणात परभणी जिल्ह्यातील बंजारा समाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, भौगोलिक स्थान व क्षेत्रफळ तसेच एकूण भौगोलिक स्थानापैकी किती ठिकाणी हा समाज वसलेला आहे याचा अभ्यास केला जाईल. याशिवाय परभणी जिल्ह्यातील बंजारा समाजाची एकूण लोकसंख्या विचारात घेवून शिक्षण, शेती, व्यवसाय, शिक्षणसंस्था, उद्योग, नोकरी, रोजगार यामधील प्रमाण इत्यादीवर संक्षीप्त प्रकाश टाकण्यात येईल.

प्रकरण दुसरे - बंजारा समाजाची संस्कृती

बंजारा समाजाची संस्कृती ही खुप आगळी वेगळी तसेच खूप वैशिष्ठ्यपूर्ण आहे. बंजारा समाजाने त्यांच्या संस्कृतीमध्ये पारंपरिक मूल्यांना आजही जोपासले आहे. बंजारा संस्कृतीमध्ये साजरे होणारे सण-उत्सव इतर समाजामध्ये दिसत नाहीत. यामध्ये होळी, दिवाळी, पंचमी, तीज यासारखे सण आगळया-वेगळया पध्दतीने साजरे करतात. बंजारा समाजाची वंशावळ त्यांच्यातील विविध जाती उदा. राठोड, पवार, चव्हाण, जाधव, आडे तसेच या उपजाती यांना खूप महत्त्व आहे.

बंजारा समाजातील संस्कृतीमध्ये त्यांचे रितीरिवाज, परंपरा, खान-पान, केशभूषा, वेशभूषा वेगळया पध्दतीने पहायला मिळते. स्त्री वेशभूषेमध्ये फेटिया, काचळी, ओढणी परिधान करताना दिसून येते तर पुरूष वेशभूषेमध्ये शर्ट, बंडी (राजस्थानी), धोतर, खांद्यावर रूमाल, शेला तर डोक्यावर मोठी लाल पगडी (फेटा) पहायला मिळतात.

याशिवाय या समाजातील विविध लोक समजूती, स्त्रियांचे दागीणे, गोरबोली, खाद्य संस्कृती नाणे, भांडी, जंगल, वृक्ष, पशु-पक्षी, भाजीपाला, नातेगोते, खेळ, श्रध्दा-अधंश्रध्दा, निसर्मपुजा, बळी देणे, देवी पुजा, कुलवंश याचाही आढावा सदरील शोधप्रबंधामध्ये करण्यात येईल.

प्रकरण तिसरे - बंजारा समाजातील स्त्रियांच्या लोकगीतांचे स्वरूप

बंजारा समाजातील स्त्रियांच्या लोकगीतांचा अभ्यास करताना असे जाणवते की, या समाजातील लोकगीते ही जास्त प्रमाणत मौखिक स्वरूपात पहायला मिळतात. या स्त्रिया समुहाने एकत्र येवून लोकगीत गाताना दिसतात. विविध सण-उत्सवाच्या वेळी मौखिक पध्दतीने गीत गाऊन आपले व इतराचे मनोरंजन करतात व यात आपला आनंद मानतात. जसे होळी सण साजरा करताना स्त्रियांनी आपल्या भावना गीतातून व्यक्त केल्या आहेत. त्या अशा

डफडा वजायेवाळो कोर छी क गोररे...
डफडा सुदो वजारे मांदा
तारे डफडान जोडू दोयेरी फूंदा
खोळ छ... ये गीलो, वजाये वाळो ढीलो
डफडा सुदो ...

बंजारा स्त्री लोकगीतांत जाणीवपूर्वक रसाची योजना केलेली नसताना त्यांच्या बहुसंख्य गीतात शांत रस, करूण रस, श्रृगार रस, हास्य रस, रौद्र रस इत्यादी रस आढळतात. जसे शिमग्याच्या वेळी बोलल्या जाणाऱ्या लेगी गीतातून श्रृंगार रस, विवाहा वेळीच्या 'ढावलो' गितांतून करूण रस, तीज सणाच्या वेळी गायल्या जाणाऱ्या गीतातून शांत रस, हास्य रस इत्यादी रसाची अनुभूती येते.

श्रृगार रसाचे उदा.

हाटेम जारी म माठ लेन !
आडायो कान्हा माथे परेरे घडीयान !
म राधा गोरी तू काळो कन्हैया !!
तारी मारी जोडी न लाग कन्हैया !

बंजारा समाजाचा खरा इतिहास त्यांचे सामाजिक जीवन आज केवळ मोठया प्रमाणात मौखिक बोलीभाषा आणि त्यांची सांस्कृतिक परंपरामधून जिवंत आहे. बंजारा लोकगीतांतून स्त्रियांची खरी संस्कृती व इतिहास पहायला मिळतो.

या शोधप्रबंधामध्ये बंजारा समाजातील स्त्रियांच्या लोकगीतांचा अभ्यास अगदी सूक्ष्म पध्दतीने केला जाईल. जसे सण-उत्सव गीत, विधीगीत, मुत्यू संस्कार गीत, जन्म संस्कार गीत इत्यादी. बंजारा

समाजाची बोलीभाषा ही गोरमाटी असल्यामुळे आपल्याला बहूतेक लोकगीत हे बंजारा बोलीतच (गोरमाटी) ऐकायला मिळतात.

प्रकरण चौथे - बंजारा समाजातील स्त्रियांच्या लोकगीतांचे वर्गीकरण

परभणी जिल्ह्यातील बंजारा समाजातील स्त्रियांच्या लोकगीताचे वर्गीकरण खालीलप्रमाणे करता येईल.

1) बालकाचे लोकगीते :-

यामध्ये बालक जन्म संस्कार, बारसे संस्कार तसेच विवाह संस्कार गीत याचा समावेश असेल.

उदा :- बारसे संस्कार गीत

चारी क चारिया चंपा मोर
जु जु चंपा लेरा ल
उट सपूती घर की नार
ये छोरारो हुओ तेवार

अर्थ :- ज्याप्रमाणे चमेलीचा वेल वाढतो त्याप्रमाणे बाळाची वाढ होवू दे असे आर्शीवाद स्त्रिया मागतात.

2) पुरूषाची लोकगीते :-

यामध्ये भजन, होळी, आरदास, धुंड गीत, श्रमपरिहार, लेंगी गीत, बालाजी गीत या गीताचा समावेश असेल.

उदा :- होळी गीत

देवळे ती आयो भाया
काई रंग लायो !
झांज, नंगारा वोरे साथ
देवळेती आयो र !!

3) स्त्रियांची लोकगीते :-

01. मुत्यू संस्कार गीत -

02. विधीगीत - लग्न गीत, छडपूजा, मळेर पध्दत, बारसे गीत

03. सण व उत्सव गीत - यामध्ये नागपंचमी, दसरा, दिपावली, होळी तसेच तीज, यामध्ये गायल्या जाणाऱ्या गीतांचा अभ्यास केला जाईल.

उदा :- लग्न गीत (मेहंदी पिसेर गीत)

मेंदी दळ मेंदी दळ हे हे लाडा

जु तार भाई-भोजाई दळगे

जु तू दळल हे हे लाडा

(अर्थ :- लग्नातील मेंहदीची हळद दळण्याकरीता वधूच्या भावाला विनंती केली आहे.)

04. स्त्रियांची अन्य लोकगीते -

1) शेतात काम करताना गायली जाणारी गीत.

2) देवी-देवतासंबधी गायली जाणारी गीते, उपासना गीते.

3) जात्यावरची गीते

4) अंगाई गीत (बालक सांत्वन गीत)

5) प्रणय गीत

(होळी गीत - होळीच्या सणात खेळण्यासाठी स्त्रियाचा गट समूहाने नाचगाणे म्हणतो. याला लेंगी म्हणतात.)

उदा :- अंबाहेट वावडी ओरी नवलक पायली

वावडीम एक नळ पाणी छ रे !

पाणी देवेण चडच

वावडीम एक नळ पाणी छ रे !!

(आंब्याच्या झाडाखालील त्या विहीरीतील पायऱ्या व पाणी तसेच नळ (पाईप) याचे वर्णन केलेले आहे.)

प्रकरण पाचवे - बंजारा समाजातील स्त्रियांच्या लोकगीतांची वैशिठ्ये

1) मौखिक परंपरा :- बंजारा स्त्री गीतांना मौखिक परंपरा लाभलेली आहे.

2) निरक्षरता :- लोकगीत गाणारी स्त्री ही बहुतेक निरक्षर असते.

3) लयबध्दता :- बंजारा लोकगीत लयबध्द व तालबध्द असते.

4) पारंपरिक वाद्य :- बंजारा समाजातील लोकगीते ही पारंपरिक वाद्यावर गायली जातात. उदा. डफ, थाळी, नंगारा, ढोलकी, काठी इत्यादी.

5) भावभावनांचे आविष्कार :- स्त्री लोकगीतातून जनमाणसाच्या भावभावनांचे आविष्कार जाणवतात.

6) समाजसंस्कृती :- लोकगीतातून समाजसंस्कृती प्रक्रट होताना दिसून येते.

7) रितीरिवाज :- समाजातील रितीरिवाज, रूढी, परंपरा, सण-उत्सव यांचे प्रतिबिंब लोकगीतांतून उमटलेले दिसतात.

8) बोलीभाषा :- बंजारा स्त्री लोकगीतांची भाषा ही बोलीभाषा (गोरमाटी) असते, प्रमाणभाषेशी तिचा कोणताही संबध नसतो.

9) केंद्रबिंदू स्त्री :- बंजारा समाजातील लोकगीतांमध्ये महत्त्वाचा केंद्रबिंदू स्त्री असते.

10) समुहता :- लोकगीत हे समुहामध्ये गायले जाणारे गीत आहे. सर्व स्त्रीयां एकत्र येवुन लोकगीत गातात.

11) कर्ता :- बंजारा स्त्री लोकगीतांचा कर्ता हा अनामिक आहे.

12) लोकसंस्कृती :- बंजारा स्त्री लोकगीतांतून लोकसंस्कृतीचे दर्शन घडते.

13) भावना :- बंजारा संस्कृतीमध्ये स्त्री लोकगीतातून सुखदु:खाच्या भावना व्यक्त होतात.

प्रकरण सहावे - बंजारा समाजातील स्त्रियांच्या लोकगीतांचे वाङमयीन मूल्यमापन

परभणी जिल्ह्यातील बंजारा समाजातील स्त्रियांच्या लोकगीतांचे वाङमयीन मूल्यमापन करताना असे लक्षात येते की, त्या त्या समाजातील लोकगीतातील मूल्यविचार व मूल्य कल्पना त्याच्या संस्कृतीला साजेशा असतात. ही लोकगीते जरी आनंदासाठी, मनोरंजनाकरिता किंवा करीत असलेले कष्ट कमी व्हावे यासाठी गायली जात असली तरी यामुळे पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या संस्कृतीचे रक्षण होत असते हे महत्त्वाचे आहे, या लोकगीतामध्ये भाषिक सौदर्य, कल्पनाविलास, भावनाविष्कार, लालित्य, रसानुभूती, अलंकार इ. वाङमयीन मूल्ये आढळतात.

लोकगीतांतून वास्तवाची भूमिका निर्माण होत असते लोकगीतांची भाषा जरी लोक व्यवहाराची किंवा बोलीभाषा असली तरी त्या भाषेतून नवीन चैतन्य निर्माण होते. बंजारा स्त्री लोकगीतांना स्वत:च्या भाषेचा नाद, स्वत:ची एक अंतरिक लय, शब्दरचना, नृत्य आणि संगीत या सर्वांचा आधार घेवून समुहाने सादर करण्याची पध्दत विलक्षण आहे. बंजारा लोकगीत कालानुरूप बदलत जात आहे. जुने गीत लयाला जावून नवीन गीताची निर्मिती होते. कालानुसार रचना, प्रतिमा, प्रतिके, दैवते, रूढी, परंपरा, नवीन चालीरिती निर्माण होताना पहायला मिळते. स्त्री बंजारा लोकगीतांमध्ये शब्द सूर, लय, नृत्य, नाद, संगीत, प्रसंग यांचे पडसाद लोकगीतांमध्ये पहायला मिळतात. परक्या संस्कृतीचे स्पर्श न झालेले, लोक व्यवहाराचा जिवंतपणा तसेच कलात्मक आविष्कार असणारे लोक साहित्यातील बंजारा स्त्री लोकगीत हे बंजारा (मराठी) साहित्याचा अस्सल खजिना आहे. जे कधी जुने होणार नाही. यांचा अभ्यास वेगवेगळ्या अंगाने होत राहील, यात शंकाच नाही.

प्रकरण सातवे - समारोप

या शोधप्रबंधामध्ये परभणी जिल्ह्यातील बंजारा समाजातील स्त्रियांच्या लोकगीताचे विशेष नोदंविण्यात आलेले आहेत. बंजारा समाजातील लोकगीताचे स्वरूप, विशेष, रूढी, परंपरा, विवाहसंस्था, अलंकार, वेशभूषा, सण-उत्सव, गोरबोली इत्यादी घटकांचे विशेष या ठिंकाणी नोंदविलेले आहेत. तसेच प्रस्तुत प्रकरणात वरील संशोधन आराखडयाप्रमाणे संशोधन करून मागील प्रकरणांचा थोडक्यात आढावा घेतला जाणार आहे. विशेष म्हणजे शोध प्रबंधाच्या शेवटी संदर्भग्रंथ सूची देण्यात येणार आहे. हा संशोधन आराखडा प्राथमिक स्वरूपाचा असून भविष्यात यामध्ये काही बदल करणे आवश्यक वाटल्यास त्यामध्ये बदल होऊ शकेल. अथवा प्रस्तुत शोध प्रबंधातील एखादे दुसरे प्रकरण कमी जास्त होऊ शकेल.

संदर्भ सूची

01) लक्ष्मी - नामदेव चव्हाण - प्रगती प्रकाशन, सोलापूर.

02) समिसांज - के.बी. पवार - दमाळ प्रकाशन, चंद्रपूर.

03) गोर पाण - गोर बोलीतील भाषा सौदर्य - मोहन गणुजी नाईक - निर्मल प्रकाशन, नांदेड.

04) गोरमाटी बोलीभाषेचे सामाजिक अविष्कार आणि लोकजीवन - लेखक, मोहन गणुजी नाईक- संपादन - प्रा. भारती मुडे - निर्मल प्रकाशन, नांदेड.

05) गोरधाटिर गठडी - लेखक - बळीराम रूपचंद जाधव, अरूणा प्रकाशन, नागपूर.

06) बंजारा समाज - गोरबोली आणि मौखिक वाङमय - लेखक- सुभाष राठोड - प्रकाशन, किसनराव राठोड, अध्यक्ष- राष्ट्रीय बंजारा परिषद, नवी मुंबई.

07) बटवा - नामदेव पवार - गोर प्रकाशन, नांदेड.

08) गोरमाटी लोकजीवन- काल आणि आज - मोतीराम रूपसिंग राठोड, संगम प्रकाशन, नांदेड.

09) दवाळी तोन मेरिया - संपादक- गणेश राठोड करमगेट

10) आत्माराम राठोड- गोर बंजारा इतिहास व लोक जिवन - गोरवह प्रकाशन, पुसद.

11) बंजारा लोकगीतो मे लबांणी संस्कृस्ती - प्रा. मोतीराज राठोड - अस्तित्व प्रकाशन, औरंगाबाद.

12) लदेणी- प्रा. मोतीराज राठोड - नवदुर्गा प्रकाशन, गांधी नगर.

13) गोरबंजारा इतिहास व जिवन - आत्माराम राठोड

14) बंजारा लोकगीतो मे नारीयों का योगदान - प्रा. गणपत राठोड - नेहा प्रकाशन, अंबेजोगाई-2011

15) तांडा संस्कृती - मोतीलाल राठोड - अस्तित्व प्रकाशन, औरंगाबाद-1988

16) पोरियातारा - उषा पंडीत चव्हाण- नांदेड.

17) बंजारा जमात - लोकजीवन आणि लोकगीते - प्रा. सुनिल राठोड.

18) गोरमाटी - राठोड मोतीरज - बंजारा सांस्कृतिक साहित्य परिषद, औरंगाबाद.

19) बंजारा लोगो का इतिहास - बळीराम पाटील - नवदुर्गा प्रकाशन - गांधीनगर -2012.

20) सेवालाल चरित्र - रामराव महाराज - बंजारा पुकार - नांदेड-2011.

मार्गदर्शक

डॉ. पंढरीनाथ नारायणराव धोंडगे
प्रोफेसर संशोधक मार्गदर्शक
मराठी विभाग
ज्ञानोपासक महाविद्यालय, जिंतूर जि.परभणी
पिन - **४३१ ५०९**

संशोधक

प्रा. आडे संजय लक्ष्मण
रा. गडदगव्हाण ता. जिंतूर जि. परभणी
पिन - **४३१ ५०९**